करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com |

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१११ | पाने-१२ | दि.२०/१/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश
ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106




# आमदार संजयमामा शिंदे यांचा गावभेट दौरा जोमात

## आतापर्यंत ८३ गावांना भेटी- गावागावातील प्रश्नाचे संकलन

करमाळा : करमाळा मतदार संघातील आमदार संजयमामा शिंदे यांनी १० जानेवारी पासून गावभेट दौरा सुरू केला असून, आत्तापर्यंत ८३ गावांचा दौरा पुर्ण झाला आहे. या दौऱ्यात गावागावातील प्रश्नाचे संकलन करण्यात येत असून, या सर्व समस्या सोडवण्याबाबत आमदार संजयमामा शिंदे यांचे मार्फत नियोजन करण्यात येत असल्याची माहिती आमदार शिंदे यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

करमाळा तालुक्यातील गावागवात अनेक समस्या आहेत. पिण्याचे पाणी, वीज, प्राथमिक शाळा, अपुरी शिक्षकांची संख्या, अंगणवाडी इमारतीचा प्रश्न, (पान नं.२ वर...)



विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर गावभेट दौरा करण्याचे नियोजन होते. दरम्यान कोरोनाच्या आजारात दोन वर्षे गेली. सध्या वातावरण स्थिर आहे. त्यामुळे गावागवात जावून नागरिकांशी भेटून त्यांच्या समस्या समजून घेत आहे. या दौऱ्यात कोणतेही सत्कार घेतले जात नाही, कोणालाही गटात प्रवेशाचा कार्यक्रम ठेवला जात नाही, कोणत्याही राजकिय व्यक्ती अथवा गटावर टिका केली जात नाही. हा कार्यक्रम केवळ नागरिकांच्या समस्या समजून घेणे व ज्या तातडीने सोडवता येतील त्या तात्काळ सोडवणे, अधिकारी लेवलच्या समस्या बैठक घेऊन सोडवणे, तर वरीष्ठ पातळीवरील समस्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक लावून सोडवणे असे धोरण आहे. कुकडी कालव्यात ज्यांच्या जमीनी गेल्या पण पैसे मिळाले नाहीत, त्यासाठी २० जानेवारीला कुकडीच्या वरीष्ठ अधिकाऱ्याची बैठक लावली आहे. शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी गटशिक्षणाधिकारी यांच्या सोबत चर्चा करून वरीष्ठ पातळीवर मागणी करत आहेत. गावागावात लोक आजही समाजमंदिर, हायमास्ट दिवे व गावपातळीवरील रस्ते याच जास्त मागण्या करत आहेत. त्यांना मलाच बोलत कराव लागतं. पिण्याच्या पाण्याची सोय काय?, अंगणवाडीला इमारत आहे का? शाळेची स्थिती काय आहे ? मग इतर समस्या पुढे येतात. उजनी काठावरील गावात सुबत्ता आहे पण पुर्नवसनाच्या अद्याप समस्या आहेत. त्या सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. आत्तापर्यंत ८० गावांचा दौरा पूर्ण केला आहे.



सोयीचा गैरफायदा घेतला की सर्वांचीच गैरसोय होते.

## संपादकीय..........................................!

# शक्तीस्थान - कांचनपूर

कांचन याचा अर्थ सोने. रामायणात सीतेने कांचनमृगाची चोळी शिवण्यासाठी कांचनमृगाच्या पाठीशी प्रभुरामाला पाठवले. कांचनमृग म्हणजे सोनेरी हरण. रावणाची लंका ही सोन्याची होती म्हणून तीला कांचननगर म्हणले जाते. रावणाची लंका सोन्याची कशी झाली याची एक आख्यायिका आहे. शंकर-पार्वत्ती हे डोंगरात रहात होते. एकदा पार्वतीला आपण सोनेरी महालात रहावे; असे वाटले. त्यानंतर पार्वतीने शंकराला तशी विनंती केली. शंकराने कुबेराला आदेश दिला व मग कुबेराने समुद्रात सोन्याचा महाल बांधला. पुढे रावणाने तेथे स्वारी केली व तो महाल जिंकला व आपल्या राज्यात आणला. त्यामुळे रावणाची लंका सोन्याची झाली. ज्यावेळी रावणाने लंका जिंकली त्यावेळी पार्वतीने रावणाला शाप दिला ही सोन्याची लंका जळाल्याशिवाय राहणार नाही. पुढे सीतेच्या शोधात गेलेल्या हानुमंताने ही लंका आपल्या शेपटीने जाळली, अशी त्याची कथा आहे.

थोडक्यात रावणाची लंका म्हणजे कांचनपुर म्हटले जाते. त्याशिवाय सध्या ते कांचनपूर नेपाळ या देशात असून कांचनपूर हा जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. या कांचनपूरमध्ये धार्मिक तीर्थस्थळे आहेतच, त्याशिवाय बंधा लेक, बेटकोट लेक, पॅरा लेक, झिलमीला लेक, शुक्लपंथा लेक, शोवा लेक अशी अनेक छोटे-छोटे तलावासाठी हे ठिकाण प्रसिध्द आहे. याशिवाय दुसरे कांचनपूर हे महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहराजवळचे असलेले गाव आहे. ते सर्वसाधारण गाव म्हणून प्रसिध्द आहे. तिथे फारशा सुविधा किंवा वैशिष्ट्ये नाही. तिसरे कांचनपूर हे धुळे जिल्ह्यातील सिंधखेडा तालुक्यात असलेले गाव आहे. ते सुध्दा सर्वसामान्य गाव आहे.

आपल्या तालुक्यातही एक कांचनपूर आहे. ते कांचनपुर म्हणजे कात्रज. या कात्रजलाच पूर्वापार कांचनपूर म्हणतात. अपभ्रंश होत कांचनचे कात्रज असे नाव झाले आहे. या गावात निळकंठेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर उजनीच्या पाण्याच्या काठावर असून या मंदिराच्या बाजुला भीमा नदीचा उंच कठडा आहे. उंच भागातून खाली वळण घेत जावे लागते. मंदिराच्या तीनही बाजूने उजनीचे पाणी आहे. विशेषत: कितीही मोठा दुष्काळ पडलातरी मंदिराच्या जवळचे पाणी कधीच आटत नाही. या गावात चिलयाबाळाची कथा सांगितली जाते. विशेष म्हणजे निळकंठेश्वराच्या शेजारीच पाण्यात चिलयाबाळाचे मंदिर आहे. चांगुणाच्या सत्व हरणाची कथा या कांचननगरीत घडल्याबाबत दंतकथा आहे. या गावात खंडोबाचे मंदिर असून खंडोबाची यात्राही भरते. खंडोबाचे मंदिर हे उंच पठाडावर आहे. याशिवाय या गावात महादेव मंदिर, मारूती मंदिर आणि नव्याने निर्माण झालेले साईबाबा मंदिर बांधण्यात आले आहे. या गावात गुढीपाडव्याच्या दिवशी समाप्ती होणारा अखंड हरिनाम सप्ताह होतो. तसेच साईबाबा मंदिरातही हरिनाम सप्ताह होतो. या गावात पूर्वी सुखदेव महाराज म्हणून राहण्यासाठी आले होते. त्यांनी काही दिवस मंदिरात सेवा केली आणि एक दिवस जलसमाधी घेतली. या गावात लक्ष्मीआईचेही मंदिर आहे. एवढेच नाहीतर अंगारा-धुपारा देणारे मांत्रिकांची संख्याही मोठी आहे. या निळकंठेश्वराचे महत्व लक्षात घेऊन या ठिकाणी जिल्हा परिषदेचे विश्रामगृह आहे. कात्रज येथे निळकंठेश्वर मंदिराचा परिसर अतिशय देखणा आहे. या ठिकाणी घाट बांधला, वरपासून खालपर्यंत कलाकृतीतून पायऱ्या बांधल्या तसेच मंदिर परिसरात उत्तम उद्यान उभारले तसेच लहान मुलांसाठी खेळणी उभारलीतर हा परिसर एक देखणा परिसर म्हणून व पर्यटन क्षेत्र म्हणून नावारूपाला येऊ शकते. या मंदिराजवळच कायमस्वरूपी पाणी असल्याने नौकानयन करणे, मासे पकडणे, या पाण्यात होडीवर निवास व्यवस्था केल्यास पर्यटकांना पाण्यात राहून एक वेगळा आनंद अनुभवता येणार आहे. या पाण्यावर येणारे वेगवेगळे पक्षी पाहणे हा ही एक भाग महत्वाचा आहे.

कात्रज येथे येण्यासाठी अद्यापही चांगला रस्ता नाही. जिंती येथील रामवाडी चौकात आल्यानंतर कात्रजला रस्ता फुटतो. कोर्टीकडून, करपडीकडून, डिकसळकडून तसेच पोफळज चौकातून अशा वेगवेगळ्या भागातून कात्रजला येण्यासाठी रस्ते आहेत. काही रस्ते चांगले आहेत तर काही रस्ते अद्यापही खराब आहेत. त्यामुळे या भागात येण्यासाठी उत्तम रस्ते करण्याची गरज आहे. कात्रज पासून जवळच मकाई कारखाना, ऐतिहासिक जिंती गाव तसेच डिकसळ पुलावर येणाऱ्या पक्षीनिरीक्षणाचा आनंद असे एक ना अनेक पर्यटकांना खुणवणारे पर्याय आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने कांचननगरी असणाऱ्या कात्रजचा उध्दार करण्यासाठी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी निर्णय घेऊन कामाला लागणे आवश्यक आहे.

पान १ वरून पुढे...

## आमदार संजयमामा शिंदे यांचा गावभेट दौरा जोमात

गावांतर्गत रस्ते, तहसील कार्यालय, पंचायत समिती, बांधकाम विभाग, भुमीअभिलेख कार्यालयासह पोलीस कार्यालयाच्याही समस्या लोक या भेटीत देत आहेत.

आमदार संपर्क कार्यालयातील प्रा.डॉ.विकास वीर जादा माहिती देताना म्हणाले, की हा दौरा पुर्ण राजकारण विरहीत आहे. दौऱ्याचे नियोजन पुर्ण झाले की आदल्या दिवशी जाहीर केला जातो. सोशल मिडीयाचा मोठा फायदा होतो. मामा वेळेवर जातात व वेळेवरत निघतात. दौऱ्यात कोणतीही औपचारीकता नसल्याने वेळ जात नाही. ना सत्कार, ना खुर्ची, ना हार तुरे.. गावात गेले,की आहे, त्या लोकांच्या समस्या समजून घेतल्या जातात, लेखी निवेदन स्विकारले जातात, आवश्यक त्याबाबी च्या नोंदी आम्हाला घ्यायला लावतात व ज्या समस्या तातडीने सोडवता येतील त्या त्वरीत सोडवल्या जात आहेत.

## डिकसळ पुलाचे काम त्वरीत चालू करावे : माजी सरपंच देविदास साळुंके



करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील रहदारीच्या दृष्टीने महत्वाचा मानला जाणारा डिकसळ पुल खचला असून या खचलेल्या पुलाची दुरूस्ती तसेच नवीन पुलासाठी ५० कोटी रूपये मंजूर असून या नवीन पुलाचे काम त्वरीत चालू करावे; अशी मागणी कोंढारचिंचोली येथील माजी सरपंच देविदास साळुंके यांनी केली आहे.

याबाबत श्री.साळुंके यांनी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले असून त्यात त्यांनी म्हटले आहे, की कोंढारचिंचोली ते डिकसळ या जुन्या रेल्वे लाईन वरील ब्रिटिशकालीन ४०० मीटर लांबीचा मोठा पुल आहे. या पुलावरून या भागातील ४० ते ४५ गावांचा संपर्क भिगवण, पुणे, बारामती आदी गावांशी आहे. त्यामुळे या पुलाची या भागातील नागरीकांना अत्यंत गरज आहे. या पुलावरून गेली १५ वर्षापासून जडवाहतूक होत असल्याने पुलास मध्यंतरी भगदाड पडले होते. त्यावेळीही बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करून पुलावरील जड वाहतूक बंद करण्याची मागणी केली होती. परंतू तरीही या पुलावरून जडवाहतूक चालू राहिली. त्यामुळे हा पुल आता खचला असून वाहतुकीसाठी निकामी ठरला आहे. जर यावरून जडवाहतूक केली तर कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता आहे. दळणवळणाचे गांभीर्य लक्षात घेऊन या पुलाचे काम त्वरीत चालू करावे; अशीही मागणी साळुंके यांनी केली आहे.

## अनुदान विहिरीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

करमाळा (सं.प्र.) : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना नवीन वैयक्तीक सिंचन विहिरीच्या कामासाठी अर्ज मागविण्यात येणार असून इच्छुक शेतकऱ्यांनी २५ जानेवारी पर्यंत विहित नमुन्यात ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर करावेत; असे आवाहन गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी केले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ४ नोव्हेंबर २०२२ मधील प्राप्त सूचनेनुसार वैयक्तीत सिंचन विहिर कामासाठी ग्रामपंचायत मार्फत अर्ज प्राप्त केले जाणार आहेत. विशेष म्हणजे हे अर्ज जिल्हा परिषदेकडे न पाठवता पंचायत समितीकडेच मंजुर केले जाणार आहेत. या अर्जासाठी सातबारा, आठ अ व सहा ड व फेरफार उतारा आवश्यक असून गटामध्ये विहिर अथवा बोअर असू नयेत. शासकीय पाणीपुरवठा विहिरीपासून ५०० मीटर पेक्षा जास्त अंतर असावे. या विहिरीचा प्राधान्यक्रम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, निरधीसूचीत जमाती, दारिद्रयरेषेखालील कुटूंबे, स्त्री कर्ता असलेले कुटूंबे, शारिरीकदृष्ट्या विकलांग असलेली कुटूंबे, जमिन सुधारणेचे लाभार्थी, इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, अडीच एकरा पर्यंतचे लाभार्थी, अल्पभुधारक (५ एकर) असा प्राधान्यक्रम असणार आहे. यासाठी २६ जानेवारीला ग्रामसभा आयोजित करून त्यामध्ये प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येणार आहे. पात्र लाभार्थी यादी व ग्रामसभा ठराव १५ फेब्रुवारी २०२३ पर्यंत पंचायत समितीकडे सादर करावा लागणार आहे. या विहिरीसाठी चार लाख रूपये अनुदान दिले जाणार आहे; असेही श्री.राऊत यांनी सांगितले आहे.

## फरहत बेगम अब्दुल वहाब काझी यांचे निधन

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील वेताळपेठ येथील रहिवाशी फरहत बेगम अब्दुल वहाब काझी (वय-८०) यांचे वृध्दपकाळाने २० जानेवारीला निधन झाले. त्यांचे मागे सात मुले, तीन मुली असा परिवार आहे. नायब तहसीलदार माजिद काझी यांचे आई होत. त्यांचे दफनविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## भुमीअभिलेख कार्यालयाच्या दुर्लक्षितपणा विरूध्द

# प्रजासत्ताक दिनी शेतकऱ्याचा आत्मदहनाचा इशारा

करमाळा (सं.प्र.): येथील भुमीअभिलेख कार्यालयातील उपअधिक्षक व त्यांचे कर्मचारी गेल्या अनेक महिन्यापासून पोटखराब जमिनीची नोंद लागवड क्षेत्रात जाणिवपूर्वक करत नाहीत त्याविरूध्द येत्या २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी भुमिअभिलेख कार्यालय समोर पेट्रोल अंगावर ओतून पेटवून घेऊन आत्मदहन करण्याचा इशारा पोंधवडी येथील दादा परबत राऊत या शेतकऱ्याने दिला आहे. याबाबत राऊत यांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक, भुमिअभिलेख कार्यालय या सर्वांना लेखी पत्र दिले आहे.

त्यात त्यांनी म्हटले आहे, की १२/१०/२०२१ ला पोंधवडी येथील गट नं.१५३/१ चे पोटखराब जमीन लागवड क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत अर्ज दिला होता. त्याचा पंचनामा होऊन त्याचा अहवाल मंडल अधिकाऱ्याने तहसीलदार यांचेकडे दिला. तहसीलदाराने ३/६/२०२२ ला या बाबतचा सविस्तर अहवाल उपअधिक्षक भुमिअभिलेख करमाळा यांना पाठविला व योग्य ती दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर वारंवार प्रयत्न करूनही उपअधिक्षक कार्यालय भुमिअभिलेख कोणतीही कार्यवाही करत नसल्याने आत्मदहन करण्याशिवाय पर्याय नसल्याने श्री.राऊत यांनी म्हटले आहे. श्री.राऊत यांनी दिलेल्या निवेदनानंतर महसुल विभागात खळबळ उडाली आहे.

# स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर



करमाळा (सं.प्र.) : शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त २३ जानेवारीला करमाळा शहरात शिवसेना-युवा सेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जय महाराष्ट्र चौक येथे भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबीर सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. या शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे, महिला आघाडी जिल्हा संघटिका आशा टोणपे, युवा सेना जिल्हा प्रमुख सचिन बागल, युवती सेना जिल्हा प्रमुख साक्षी भिसे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या शिबीरात जास्तीत जास्त शिवसैनिक, युवा सैनिक व नागरीकांनी सहभाग घेऊन रक्तदान करावे; असे आवाहन युवा सेना सोशल मिडीया प्रसिध्दी प्रमुख अजय साखरे यांनी केले आहे.

## मकाईला १६ जानेवारी पासून गळीतास येणाऱ्या ऊस बिलाचा

# प्रथम हप्ता २३०१ रू. प्रमाणे देण्यात येणार : हरिश्चंद्र खाटमोडे

करमाळा(सं.प्र.) : श्री मकाई सहकारी साखर कारखान्यास १६ जानेवारी पासून गळीतास येणाऱ्या ऊसाचे बिल हे प्रथम हप्ता २३०१ रू. प्रमाणे काटा पेमेंट करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच उर्वरित १०० रू. बैलपोळा व १०० रू. दिवाळी सणासाठी असे २५०१ रुपये अंतिम ऊस बिल अदा करण्यात येणार आहे; अशी माहिती प्रभारी कार्यकारी संचालक हरिश्चंद्र खाटमोडे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली. १६ नोव्हेंबर २०२२ पासूनचे ऊस बिल देखील नियमितपणे चालू राहील याची नोंद घ्यावी. त्याचबरोबर ऊस वाहतूक करणारे तोडणी वाहतूक कंत्राटदार यांना देखील काटा पेमेंट देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तरी सर्व ऊस उत्पादकांनी आपला ऊस श्री मकाई सहकारी साखर कारखान्यास गळीतास देवून सहकार्य करावे; असेही आवाहन खाटमोडे यांनी केले आहे.

# दूध संस्थेचे माजी चेअरमन ज्ञानदेव दळवी यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : बिटरगाव श्री येथील गणेश दूध संस्थेचे माजी चेअरमन ज्ञानदेव देवराव दळवी (वय-७८) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. झरे येथील नामदेवराव जगताप विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक दत्तात्रय दळवी यांचे ते वडील तर पखवाज वादक वैभव दळवी यांचे ते आजोबा होते. बिटरगाव येथे त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.


# ओपन प्लॉट विकणे आहे

करमाळा येथील सागर थिएटरजवळ, नवरत्न कॉलनी मधील दोन्ही बाजूला मोठे रस्ते व समोर ओपन स्पेस असलेला कॉर्नरचा ओपन एन.ए. प्लॉट (९३१ स्क्वे.फुट) योग्य किंमतीत विकणे आहे

**संपर्क : श्री.अनिल तळेकर, मो.९५११८१३२७७**



**ओजस हॉस्पिटल**
OJS HOSPITAL
AIIOPATHY AYURVED HOMEOPATHY

**डॉ.रोहन रामदास कुंभार**
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ

**डॉ.मनोज रामदास कुंभार**
M.D. कन्सलटींग फिजीशीयन

**डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार**
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट

✻ वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ ✻
✻ २४ तास अत्यावश्यक सेवा ✻

**डॉ.सौ.सायली मनोज कुंभार**
M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ

**ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी** शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..

उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा) Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत) PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test (गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)

**पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950**


# कमलाई वीटभट्टी असो; तर्फे सुधाकर काका लावंड यांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : कमलाई वीट भट्टी असोसिएशन तर्फे शिवसेना तालुकाप्रमुख व असोसिएशनचे अध्यक्ष सुधाकर(काका) लावंड यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी सुनील(बापू) सावंत, राहूल परदेशी, उत्तम कुंभार, नामदेव कांबळे, देवा लोंढे, तबरेश सय्यद, राजेंद्र कुंभार, सागर काळे, संभाजी माने, बापू जाधव, गुलाम सय्यद, अक्षय कुंभार, सुनील कुंभार, वसीम सय्यद, राहूल कुंभार, अतुल कुंभार, दत्ता शिंदे, भाऊसाहेब करगळ आदी मान्यवरांसह असोसिएशनचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# हरहुन्नरी कलाकार दिपक राखुंडे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील कानाडगल्ली येथील रहिवासी दिपक अरूण राखुंडे (वय-३७) यांचे अल्प आजाराने १८ जानेवारीला पहाटे निधन झाले. त्यांच्या मागे आई-वडील, पत्नी, दोन मुले, विवाहित बहिण असा परिवार आहे.

दिपक राखुंडे हे हरहुन्नरी कलाकार होते. राजकीय नेत्यांचे तसेच चित्रपटातील प्रसिध्द अभिनेत्याचे डायलॉग बोलण्यासाठी ते प्रसिध्द होते. सर्वांना प्रेमळ व आदराने बोलत असल्याने करमाळा शहरात ते चांगल्या परिचयाचे होते. सा.कमलाभवानी संदेश कार्यालयात त्यांनी काही वर्ष वृत्तपत्राचे कामकाज केले. त्यांच्या अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर करमाळा शहरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.


**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600

**डॉ.डी.बी.केमकर**
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

उपलब्ध सुविधा...
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार ● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

**सिध्दीविनायक ऑप्टीकल्स्** आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बँक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६

# विधवांना प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत : रश्मी बागल-कोलते




करमाळा(सं.प्र.) : स्त्रियांनीच विधवांना प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत; असे प्रतिपादन बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल यांनी केले.

हिवरवाडी येथे आयोजित विधवा महिलांच्या हळदी-कुंकू समारंभात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद झिंजाडे हे होते तर प्रमुख मान्यवर म्हणून यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हा प्रमुख महेश चिवटे, प्रा.प्रदीप मोहिते उपस्थित होते.

पुढे बोलताना रश्मी बागल यांनी विधवा प्रथा बंदीसाठी पुढाकार घेणारे सामाजिक कार्यकर्ते प्रमोद झिंजाडे यांचे कौतूक केले.

यावेळी महेश चिवटे यांनी झिंजाडे यांनी राबवलेला उपक्रम नक्कीच स्वागतार्ह आहे. याचे अनुकरण प्रत्येकाने स्वत:हून करायला हवे; असे सांगितले. यावेळी सरपंच अनिता पवार यांनी भाषण करताना जसा विधवांसाठी पहिला कार्यक्रम आपण घेतला तसाच आरोग्याच्या बाबतीतही पहिला कार्यक्रम हिवरवाडीत राबवण्याचे जाहीर केले. यावेळी ग्रामसेविका जयश्री सुतार यांच्यासह विधवा महिलांना पोळी डबा भेट म्हणून देण्यात आला. यावेळी संभाजी गुळवे, वैशाली इरकर, बापू इरकर, प्रियंका इवरे, मधुकर पवार, सोपान पवार, आजिनाथ इरकर, अनिल पवार, आयोजक सुप्रिया पवर, संगीता पवार, शितल पवार यांचेसह बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# आदिनाथ साखर कारखान्याच्या साखर पोत्यांचे पूजन



करमाळा(सं.प्र.) : मकरसंक्रांतीच्या मुहूर्तावर श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या साखर पोत्यांचे पूजन बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार नारायण पाटील, चेअरमन धनंजय डोंगरे, व्हा.चेअरमन रमेश कांबळे, दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, माजी कार्यकारी संचालक हरिदास डांगे, संचालक डॉ.हरिदास केवारे, डॉ.वसंतराव पुंडे, जिल्हाप्रमुख महेश चिवटे, बचाव समितीचे सर्व सदस्य, सभासद, अधिकारी वर्ग उपस्थित होते. आदिनाथच्या पहिल्या उत्पादीत पाच साखर पोत्याचे पूजन यावेळी करण्यात आले. यावेळी दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामदास झोळ यांनी आदिनाथच्या प्रत्येक सभासदांनी आपला २० टक्के ऊस देऊन कारखान्याला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सहकार्य करावे; असे आवाहन केले.

ज्या शेतकऱ्यांनी आदिनाथ कारखान्याला ऊस गळीतास दिला आहे, त्या ऊसाचे पेमेंट व तोडणी वाहतूक तात्काळ देण्यात येत आहे. यासाठी जास्तीत जास्त शेतकरी सभासदांनी आदिनाथला ऊस गळीतास पाठवून सहकार्य करावे; असे आवाहन चेअरमन धनंजय डोंगरे यांनी केले.

आदिनाथ कारखाना बारामती ॲग्रो ऐवजी सभासदांच्या मालकीचा राहावा; यासाठी बचाव समितीने आदिनाथ मंदिरात पहिली बैठक घेतली होती. संकल्पपूर्ती झाल्याने आदिनाथ कारखान्यातून निर्माण झालेल्या पहिल्या साखरेच्या पोत्यातून संगोबा येथील आदिनाथ महाराजांच्या मंदिरात शिरा बनवून महाप्रसाद म्हणून बचाव समितीने उपस्थित सर्वांना वाटप करण्यात आला.

# गीतादेवी आगरवाल यांचे वृध्दपकाळाने निधन



करमाळा(सं.प्र.) : येथील रामभरोसे हॉटेलचे मालक ललित आगरवाल यांच्या मातोश्री गीतादेवी लक्ष्मीनारायण आगरवाल (वय-८०) यांचे वृध्दपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या मागे दोन मुले, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. गीतादेवी आगरवाल या अतिशय दयाळू व कष्टाळू होत्या. पहाटे पाचला रामभरोसे हॉटेल उघडून त्या काम सुरू करत होत्या. सर्व नातेवाईकांशी त्यांचा अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांचेवर सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाहक ललित आगरवाल यांच्या मातोश्री तर भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल व ॲड.प्रियाल आगरवाल यांच्या त्या आजी होत.

कृष्णा हॉस्पिटल
• कार्डिॲक, लॅप्रोस्कोपी, आय.यु.आय. ॲन्ड मॅटर्निटी केअर सेंटर •
राशिनपेठ, करमाळा. फोन(०२१८२) २२००८९
ओपीडी वेळ : सकाळी ९ ते ४, सायं.७ ते ९ (रविवारी बंद)

डॉ.प्रमोद रासू कांबळे
एम.डी.(जनरल मेडिसीन) कन्सल्टींग फिजीशियन
हृदयविकार, मधूमेह व मेंदूविकार तज्ञ

डॉ.सौ.कविता प्रमोद कांबळे
एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.(मुंबई)
कन्सल्टींग गायनॅकोलॉजिस्ट ॲन्ड सोनोलॉजिस्ट
स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ

पाहिजेत
प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ/कर्मचारी
(विशेषत: रात्रपाळी नाईट ड्युटीचे कामासाठी)

उपलब्ध सुविधा

मेडिसीन....
• २४ तास अत्यावश्यक सेवा
• आय.सी.यु./आय.सी.सी.यु.
• ई.सी.जी., • कार्डियाक मॉनिटर्स
• डिफ्रिब्रीलेटर • एक्स-रे
• कृत्रिम श्वासोच्छवास व्यवस्था
• सेंट्रल ऑक्सिजनची सोय
• रक्तदाब, मधुमेह, मेंदूविकार व फुफ्फुसांचे आजाराचे निदान व उपचार
• सर्पदंश उपचार, पॅथॉलॉजी लॅब
• मेडिकल स्टोअर्स • इमर्जन्सी जनरेटरची सोय

स्त्रीरोग व प्रसुती विभाग...
• अल्ट्रासोनोग्राफी
• एन.एस.टी.मशिन
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर
• प्रसुतीपूर्व तपासणी
• सुखरूप बाळंतपणाची सोय
• वेदनारहित प्रसुती
• वंध्यत्व चिकित्सा केंद्र
• स्त्रियांच्या सर्व ऑपरेशनची सोय
• कॉल्पोस्कोपी

नावनोंदणी ओपीडी वेळ
सकाळी ८ ते १२ पर्यंत, दुपारी ३ ते ५ पर्यंत
संपर्क : मो.7083071610
वरील नंबरवर सात दिवसापर्यंत नावनोंदणी घेण्यात येईल.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
मकरसंक्रांतीनिमित्त साड्यांचा भरपूर स्टॉक
व भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186


## महिलांच्या सन्मानास प्राधान्य दिल्यास
# जिजाऊंच्या आदर्शावर आधारीत समाजप्रणाली कार्यरत होईल : प्रा.डॉ.चौधरी



करमाळा(सं.प्र.) : समाजातील विधवा प्रथा कायमची बंद करून महिलांच्या सन्मानास सर्वोच्च प्राधान्य दिल्यास जिजाऊंच्या आदर्शावर आधारीत समाजप्रणाली कार्यरत होईल. घराघरामध्ये जिजाऊंचा अधिवास पहायला मिळेल; असे प्रतिपादन प्रा.डॉ.संजय चौधरी यांनी केले.

केम येथे राजमाता जिजाऊ मॉसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात चौधरी सर बोलत होते. आदर्श गोपालक परमेश्वर तळेकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्जेराव बिचितकर हे होते. यावेळी व्यासपीठावर दत्तात्रय फराडे (टेंभूर्णी), सत्यवान सुर्यवंशी, सुनिल तळेकर(जेऊर), बिभिषण देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.डॉ.चौधरी म्हणाले, की चुकीच्या रूढी परंपरांना फाटा देवून जिजाऊ मॉसाहेब यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत सर्वांनी एकत्र आले पाहिजे. आपापसातील मतभेद बाजूला ठेवून छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज या दोन छत्रपतींना घडविणाऱ्या जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाली केली पाहिजे. येणारा काळ हा अत्यंत कठीण असणार आहे. या नव्या काळातील नवनवी आव्हाने पेलताना दैवावर विसंबून न राहता प्रयत्नपूर्वक अडचणींवर मात करावी लागेल. परमेश्वर तळेकर यांच्या कार्याची व निरपेक्ष सेवेची दखल घेऊन गाईचे महत्व समाजाला पटवून देण्यासाठी परमेश्वर तळेकर यांनी आता कार्यक्षेत्र मर्यादित न ठेवता जिथे आवश्यक आहे तिथे जाऊन आपले अनुभव लोकांना सांगणे गरजेचे आहे. शासनानेही तळेकर यांच्या कामाची दखल घेऊन गोधन वाढविण्यासाठी काही महत्वाकांक्षी योजनेची रुजवात करावी; अशी अपेक्षा व्यक्त केली. उपस्थितांचे स्वागत परमेश्वर तळेकर यांनी केले. यावेळी आदर्श गोपालक, आदर्श गोसेवक व बैलजोडी जोपासलेल्या शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच ज्येष्ठ व वयोवृध्द आधारवड गं.भा.हौसाबाई तळेकर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

## जिल्हास्तरावर यश प्राप्त केलेल्या...
# खो-खो विजयी संघाची वीट ग्रामस्थांनी काढली डॉल्बीसह मिरवणूक



करमाळा (सं.प्र.) : जिल्हास्तरीय लहान गट खो-खो स्पर्धेमध्ये मुलीच्या संघाने चित्तथरारक असा विजय मिळवून करमाळा तालुक्यासह वीट गावाचे नाव जिल्ह्यामध्ये झळकाविले. त्यामुळे वीट गावातील सर्व तरूण वर्ग, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती तसेच सर्व प्रतिष्ठीत व्यक्तींनी या विजयी संघाची वीट गावातून डॉल्बीसह भव्य मिरवणूक काढली. मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणी अनेक महिलांनी या विजयी संघाचे औक्षण केले. डॉल्बीच्या तालावर छत्रपती शिवाजी विद्यालयाचे विद्यार्थी, जिल्हापरिषद केंद्र शाळा वीटचे सर्व विद्यार्थी, गावातील तरूण वर्ग यांनी सहभागी होऊन मनमुराद आनंद लुटला. फटाक्यांची आताषबाजी करून मोठ्या जल्लोषात ही मिरवणूक अनेक ठिकाणी फुलांच्या वर्षावासह जिल्हा परिषद केंद्र शाळा वीट या ठिकाणी पोहोचली. कार्यक्रमासाठी गटविकास अधिकारी मनोज राऊत, यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य संजय कोळेकर, सरपंच उदय ढेरे, जिल्हा परिषद सदस्य बिभिषण आवटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंकुश जगदाळे, वीट ग्रामपंचायतीचे सर्व आजी-माजी सरपंच व सदस्य, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बाळासाहेब ढेरे, सर्व शिक्षक वृंद, ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे हस्ते विजयी संघातील खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून ट्रॉफी व खो-खो चे प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र देऊन सन्मान केला. यशकल्याणी संस्थेकडून सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व गोल्ड मेडल देऊन सन्मानीत करण्यात आले. विजयी संघाला जिल्हा स्पर्धेपर्यंत पोहोचविण्यासाठी छत्रपती शिवाजी विद्यालयाचे जगन्नाथ जाधव, गोरख ढेरे, बरडे सर, विनोद ढेरे, भाऊसाहेब गायकवाड, केंद्रप्रमुख चोरमले यांनी परिश्रम घेतले. या सर्व मार्गदर्शक शिक्षकांना फेटे बांधून त्यांचाही सन्मान ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. प्रास्ताविक मुख्याध्यापक अर्जुन ढेरे यांनी केले. यावेळी म्हेत्रे सर, मनोज ढेरे, तेजस ढेरे, जगन्नाथ जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे आभार गोरख ढेरे यांनी मानले

# राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त कुंभेज येथे रक्तदान शिबीर




करमाळा(सं.प्र.) : कुंभेज येथे शिवस्फुर्ती समूह सोलापूर जिल्हा यांचे वतीने राजमाता जिजाऊ मॉसाहेब यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात ९० रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोफळज शाळेच्या शिक्षिका रेखा साळुंके या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच संजय तोरमल, माजी सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष मेजर आकूर शिंदे, नौदल सेवानिवृत्त मेजर बिभिषण कन्हेरे, पक्षीमित्र कल्याणराव साळुंके, पोफळजचे उपसरपंच बिभिषण गव्हाणे उपस्थित होते. यावेळी सामुहिक जिजाऊ वंदना गायन करण्यात आले. यावेळी बहुसंख्य नागरीक उपस्थित होते.

**शिवश्री क्लिनिक**
डे केअर सेंटर

डॉ.आशुतोष पोपट कापले
B.H.M.S.(M.U.H.S.) Nasik
जनरल फिजीशियन अँन्ड होमिओपॅथिक कन्सल्टन्सी
मो.9860982072

उपलब्ध सुविधा...
- ॲडमिट करण्याची सुविधा.
- ई.सी.जी. सुविधा
- बालरूग्णांसाठी वाफेची सुविधा

२४ तास अत्यावश्यक सुविधा
- वेळ : सकाळी ११ ते रात्री १०

आमची वैशिष्ट्ये....
- सर्व आजारांवर ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक उपचार.
- मुळव्याध, त्वचा विकार उपचार.
- मानसिक आजारांवर उपचार.
- नपुसंगतेवरील उपचार.
- आहारासंबंधी योग्य मार्गदर्शन.
- मशीनव्दारे रक्तातील शुगर(BSL) व Blood Precesure तपासणी व उपचार.
- जुनाट मधुमेहातील जखम व संधिवात विकारांवर उपचार

टीप भारतीय सैन्य दलातील जवानांची तपासणी फी घेतली जाणार नाही.

अहमदनगर येथील प्रसिध्द किडनीविकार तज्ञ
डॉ.आनंद काशिद (मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ व किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी, करमाळा येथे
ओपीडी वेळ सकाळी १० ते १.००

पत्ता : सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.

UAIMS
अत्याधुनिक उपचारांसाठी आता पुण्या मुंबईला धावाधाव कशाला ?
कारण येणार आहेत उषःकाल अभिनवचे डॉक्टर तुमच्या भेटीला!

उषःकाल अभिनवच्या डॉक्टरांची
कोग्रेकर हॉस्पिटल, करमाळा येथे ओपीडी भेट.

स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ
डॉ. संजय कोग्रेकर
डॉ. स्वाती कोग्रेकर
Consultant Gynaecologist

बालरोग तज्ज्ञ
डॉ. विनया सारंगकर
Consultant Pediatrician

हृदयरोग तज्ज्ञ
डॉ. राहुल महाडिक
Consultant Interventional Cardiologist

हृदय शस्त्रक्रिया
डॉ. अमोल भोजे
Consultant Cardiothoracic & Vascular Surgeon

सांधे प्रत्यारोपण
डॉ. समीर शेख | डॉ. रवींद्र भरमगुंडे
Consultant Orthopedic Surgeon

रजिस्ट्रेशन फी ₹200

वार व तारीख : रविवार, 29 जानेवारी 2023 | ओपीडीची वेळ : स. 10 ते सायं. 4

पत्ता: कोग्रेकर हॉस्पिटल, भवानी नाका, जेऊर रोड, करमाळा
- संपर्क -
थोरात सिस्टर : 996-090-6407



# भर बाजारात चतुर पक्षाची विक्री - प्रशासनाचे दुर्लक्ष

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात शुक्रवारी बाजार दिवशी भर बाजारपेठेत चतुर पक्षाची खुलेआम विक्री झाली आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे हे प्रकार होत आहेत; अशी खंत पक्षीप्रेमींनी व्यक्त केली आहे.

करमाळा येथे शुक्रवारी बाजार असतो. हे लक्षात घेऊन बाहेरील व्यक्तीने शेकडो चतुर पक्षी विक्रीसाठी आणले होते. २५० रूपयाला जोडी असे म्हणून तो बाजारात विक्री करीत होता. या पक्षाचे मांस खाल्ल्याने वातीचे विकार बरे होतात, गुडघेदुखी थांबते; असा समज असल्याने अनेक लोक या पक्षाचे मांस खाण्यासाठी त्यांना खरेदी करतात.



राखी तितर हा चतूर या स्थानिक नावाने ओळखला जाणारा गवताळ जमीन, माळरान परिसरात आढळणारा तृणबीज तसेच शेतधान्य पिकातील किटक खाणारा शेतकरी मित्र पक्षी आहे. परंतू शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात शिकार होत असल्याने नजीकच्या काळात हा पक्षी संकटग्रस्त म्हणून गणला जाईल. स्थानिक व्यक्तींना असे चोरटी शिकार करताना आढळल्यास वनविभागाशी तात्काळ संपर्क करून माहिती कळवावी. तसेच वनविभागानेही यावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. या पक्षाची खुलेआम विक्री होत असेलतर हे चिंताजनक आहे.

...कल्याणराव साळुंके (पक्षीमित्र, करमाळा)

# खासदार निधीतून उभारण्यात आलेल्या स्ट्रीट लाईट दिव्याचे उद्घाटन

करमाळा (सं.प्र.) : सन २०२१-२२ मध्ये खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या खासदार फंडातून तालुक्यातील विविध गावामध्ये स्ट्रीट लाईट दिवे मंजूर झाले आहेत. खडकेवाडी येथे या स्ट्रीट लाईट दिव्याचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. याप्रसंगी चिवटे म्हणाले, की सन २०१९-२० मध्ये कोरोना महामारीच्या काळात खासदार फंड हा आरोग्य विभागात खर्च करण्यात आला होता. त्यामुळे विकासकामांना खोडा निर्माण झाला. येणाऱ्या काळात खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या फंडातून करमाळा तालुक्यातील जास्तीत जास्त गावांना विकासकामे मंजूर करून मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी वाशिंबेचे उपसरपंच अमोल पवार, राज्य परिषद सदस्य बाळासाहेब कुंभार जिल्हा सरचिटणीस किरण बोकन यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष रामभाऊ ढाणे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष सचिन गायकवाड, झरे ग्रा.पं.सदस्य सोमनाथ घाडगे, भैया गोसावी, तसेच खडकेवाडी येथील अशोक जाधव, भारत चौधरी, बंडू शेळके, प्रविण शेळके, धनंजय शिंदे, अजित शिंदे, शहाजी जाधव, बंडू जाधव, बळीराम चौधरी, मनोहर शेळके, दयाराम जाधव आदीजण उपस्थित होते.






किल्ला विभाग येथील विठ्ठल-रूक्मीणी मंदिराचे मालक व गायनसम्राट
**कै.पांडूरंग (बंडोपंत) वासुदेव कुलकर्णी**
यांचे नुकतेच निधन झाले.
ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची..
**भावपूर्ण श्रध्दांजली !**

शोकाकुल **अविनाश जोशी, शेखर जोगळेकर, निलेश जोशी, हरी पिंपळे**
किल्ला विभाग, करमाळा., जि.सोलापूर





मार्गदर्शक



ज्योती मुथा मॅडम



मार्गदर्शक



पल्लवी भिंगारे



चि.सुयश चौधरी

कु.विरश्री भोसले

ॲरिस्टो किडस् मार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस परीक्षेत नामसाधना सेंट्रल स्कुल मुले नं.१ मधील विद्यार्थी **चि.सुयश दयानंद चौधरी** याने झिरो लेवलमध्ये **थर्ड रँक तसेच** कै.साधनाबाई नामदेवराव जगताप प्राथ.शाळा मुली नं.१ मधील विद्यार्थीनी **कु.समीक्षा महेश थोरे** हिने सेकंड लेवलमध्ये फर्स्ट रँक **कु.विरश्री मिलींद भोसले** यांनी सेकंड लेव्हल मध्ये थर्ड रँक तर **कु.श्रावणी महेश गवळी** हिने झिरो लेव्हल मध्ये फोर्थ रँक मध्ये यश प्राप्त करून दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत निवड झाल्याबद्दल

## हार्दिक अभिनंदन !



कु.समीक्षा थोरे

कु.श्रावणी गवळी

शुभेच्छुक

**• थोरे परिवार, भोसले परिवार, गवळी परिवार करमाळा.**

**• मुथा अबॅकस अकॅडमी व ज्ञानप्रभु अबॅकस अकॅडमी, करमाळा.**

---



ॲरिस्टो किडस् मार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस परीक्षेत करमाळा येथील मुथा अबॅकस अकॅडमी मधील विद्यार्थीनी

**कु.सक्षमी सुयश दोशी**

हिने फर्स्ट लेव्हल मध्ये थर्ड रँक मिळवून दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झाल्याबद्दल



मार्गदर्शक



ज्योती मुथा मॅडम

## हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक

**• पांजरापोळ गोरक्षण संस्था, करमाळा.**

**• रूपा जनरल स्टोअर्स, करमाळा.**

---

# एस.एस.के.एस. असोसिएटस्

## अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

**संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)**

**पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टसमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.**

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.

---

# INDIRA IVF

FERTILITY & IVF CENTRE



## नि:शुल्क नि:संतानता

**वंध्यत्वावर सल्ला शिबीर**

**मोटे हॉस्पिटल, करमाळा येथे**

**24 जानेवारी 2023**

**मंगळवार, सकाळी १० पासून**

**मोटे हॉस्पिटल**

पुणे रोड, घोलपनगर, करमाळा.

डॉ.निलेश नारायण मोटे (9527276474)

इंदिरा आयव्हीएफ च्या डॉक्टरांद्वारा मोफत सल्ल्यासाठी नोंदणी करा..

**7057683021**

**या बाबीवर सल्ला घेण्याचा जोडपी विचार करू शकतात...!**

- शुक्राणूंची संख्या कमी असणे
- दुर्बळ दर्जा
- लो स्पर्म मोटिलिटी
- वॅसोलिगेशन
- शुक्राणूंची संख्या शून्य असणे

- फेलोपिअन ट्यूब्स ब्लॉक असणे
- युट्रस फायब्रॉइड्स
- बीज निर्मितीत समस्या असणे
- एंडोमेट्रिओसिस
- ॲडेनोमायोसिस
- मासिक पाळीतील अनियमितता
- बीजांचे अकाली रप्चर होणे
- पीसीओएस

**इंदिरा आय.व्ही.एफ फर्टिलिटी सेंटर**

मंत्री चांडक इकॉन, बी-विंग सिव्हिल लाईन्स, सात रस्ता चौक 413001 महाराष्ट्र भारत

• 110+Fertility Centres PAN India • Treatment protocol as per patients need • Experienced of 250+Fertility Doctors

टीप : कृपया विनामुल्य सल्लामसलत करण्यासाठी हे पॅम्प्लेट आणि आधारकार्ड सोबत ठेवा..

## माघवारी पायी दिंडीचे
# २७ जानेवारीला प्रस्थान

करमाळा(सं.प्र.): श्री हनुमान भजनी मंडळ सावंत गल्ली आयोजित करमाळा ते पंढरपूर माघवारी पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान २७ जानेवारीला सकाळी दहा वाजता हनुमान मंदिर सावंत गल्ली येथून होणार आहे. सदर दिंडी सोहळ्यात नित्याचे काकडा, प्रवचन, हरिपाठ व किर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत. या दिंडी सोहळ्यात जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे; असे आवाहन दिंडी चालक कानिफनाथ महाराज आगम यांनी केले आहे. दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी संदिप उबाळे, रमेश मोरे, राजेंद्र माहुले, प्रमोद शहाणे, जालिंदर सावंत, आजिनाथ वीर, बंडू नलवडे, अनंता बनकर, संतोष सावंत, हनुमंत गुळवे आदीजण परिश्रम घेत आहेत. तसेच या दिंडी सोहळ्यासाठी विठ्ठल सावंत, नगरसेवक संजय सावंत यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

## केम येथील माजी मुख्याध्यापक
# तुळशीराम लोंढे-पाटील यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : केम येथील माजी मुख्याध्यापक तुळशीराम आण्णा लोंढे-पाटील (वय-९०) यांचे १८ जानेवारीला अल्पशा आजाराने निधन झाले. केम येथील उद्योजक व गोकुळ डेअरीचे चेअरमन अरुण लोंढे-पाटील व ब्रिटानिया डेअरीचे व्यवस्थापक डॉ.शाम लोंढे-पाटील यांचे ते वडील होते. त्यांच्या मागे मुले, मुलगी, सुना, नातवंडे, नातसुना व पणतू असा परिवार आहे. ९० वर्षाचे असून देखील ते समृध्द, सदृढ व शेवटच्या श्वासापर्यंत स्वावलंबी आयुष्य जगले. त्यांच्या निधनाने केम परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अंत्यसंस्कार प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

# केळी उत्पादक संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी महेंद्र पाटील



करमाळा (सं.प्र.): महाराष्ट्र राज्य शेतकरी केळी उत्पादक संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी बिटरगाव सांगवी येथील प्रगतशील शेतकरी महेंद्र पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

केळी उत्पादकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य शेतकरी केळी उत्पादक संघाची स्थापना करण्यात आली आहे. संपूर्ण राज्यभरात या संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे संघटन करण्यात आले असून, केळी उत्पादकांच्या विविध समस्या सोडविण्याचा प्रयत्न संघटनेच्या माध्यमातून केले जाणार आहे. या संघाचे अध्यक्ष चव्हाण यांनी सोलापूर जिल्ह्यातील काम काम गतीमान करण्यासाठी करमाळा तालुक्यातील हुशार, अनुभवी व प्रगतशील शेतकरी महेंद्र पाटील यांची जिल्हाध्यक्ष पदी निवड केली. संघाचे तज्ञ संचालक नामदेव वालेकर, करमाळा तालुका शेतकरी केळी उत्पादक संघाचे तालुका अध्यक्ष वैभव पोळ यांच्या उपस्थितीत महेंद्र पाटील यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

निर्यातक्षम केळी उत्पादनात सोलापूर जिल्हा अग्रेसर असून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर केळीचे उत्पादन घेतले जाते. तरी केळी उत्पादकांच्या समोर अनेक समस्या असून अद्यापही शासनाने हमीभाव जाहीर केला नाही. यासाठी संघाच्या माध्यमातून आपण पाठपुरावा करणार असून, सोलापूर जिल्ह्यातील केळी उत्पादनाचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नूतन जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील यांनी सांगितले.

## शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल..
# मुकुंद साळुंखे यांना स्वामी विवेकानंद संस्काररत्न राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान



करमाळा (सं.प्र.): स्वामी विवेकानंद संस्कार प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद संस्कार-रत्न पुरस्कार सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष मुकुंद साळुंखे यांना प्रदान करण्यात आला. पिंपरी-चिंचवड येथे म.राज्य कामगार कल्याण आयुक्त रविराज येळवे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुणे चे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले, म.राज्य राष्ट्रवादी कामगार संघटनेचे अध्यक्ष शिवाजीराव खटकाळे, सिने अभिनेत्री मोहिनी कुडेकर आदी मान्यवरांच्या उपस्थित या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्रातून प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील १५ नामवंत व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. त्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रातून मुकुंद साळुंखे यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला. मुकुंद साळुंखे हे २७ वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम करत आहेत. त्यामध्ये त्यांनी अनेक शिक्षकांचे कामे संघटनेच्या माध्यमातून केलेले आहेत. त्यांनी संप, मोर्चा, आंदोलन, लाक्षणिक उपोषण आदीचा मार्ग अवलंबून शिक्षकांचे प्रश्न सोडविले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठानच्यावतीने स्वामी विवेकानंद संस्कार रत्न पुरस्कार साळुंखे यांना प्रदान करण्यात आला. दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सोलापूर जिल्ह्यातून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मुकुंद साळुंखे यांचे अभिनंदन केले आहे.

# सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: करमाळा तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की.. मिळकत डि.सोलापूर सब डि व ता.करमाळा, जि.प.सोलापूर, पं.स.करमाळा, ग्रामपंचायत वांगी हद्दीतील मौजे वांगी येथील जमीनी **अ)** गट नं.१०६/५/अ (४०/५/अ) पैकी क्षेत्र - ० हे. ८१ आर. **ब)** गट नं.१०६/५/ब (४०/५/ब) पैकी क्षेत्र - ० हे. ३० आर. **क)** गट नं.१०६/८/ब/२ (४०/८/ब/२) क्षेत्र - ० हे. ४५ आर. **ड)** गट नं.१०६/७/इ (४०/७/इ) क्षेत्र - ० हे. २२.५० आर यासी चतु:सिमा दि.५/११/२००७ रोजीचे खरेदीखता प्रमाणे

येणेप्रमाणे वरील वर्णनाच्या मिळकत १ ब, क व ड मधील वर्णनाच्या मिळकती श्री.भगवान बाबुराव तकीत तर १ अ मधील वर्णनाच्या मिळकतीसह गट नं.१०६/७/ड (४०/७/ड) या मिळकती येताळा भगवान तकीक यांच्या वडिलार्जित मालकीच्या मिळकती होत्या. सदर श्री.भगवान व येताळा तकीक यांनी वरील सर्व नमूद मिळकती आमचे अशिल श्री.शहाजी तकीक यांना कायम व खुषखरेदी देणेचे ठरविले होते. त्याप्रमाणे आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे खरेदीखत करणेपूर्वी वरील सर्व मिळकतींची मोजणी केली असता, वरील नमूद मिळकत १ अ ते १ ड मधील वर्णनाचे क्षेत्र जुळवून आले. परंतू गट नं.१०६/७/ड (४०/७/ड) पैकी क्षेत्र - ० हे. ४५ आर प्रत्यक्षात जागेवर दिसून येत नव्हते. सदर मिळकतीचे गावचे दप्तरी गट नं.१०६/७/ड (४०/७/ड) या मिळकतीचे सातबारा पत्रकी सदर श्री.येताळ तकीक यांचे नांवे क्षेत्राची नोंद दिसून येत असलीतरी प्रत्यक्षात क्षेत्र अस्तित्वात नसलेने आमचे अशिलांनी सदरची मिळकत खरेदी घेणेस नकार दिला व दि.५/११/२००७ रोजी वरील नमूद मिळकती पैकी १ अ मधील नमूद मिळकत श्री.येताळा तकीक यांचेपासून तर १ ब, क व ड मधील वर्णनाच्या मिळकती श्री.भगवान बाबूराव तकीक यांचेपासून कायम व खुषखरेदी घेतलेल्या असून सदरचे खरेदीखताअन्वये गावचे दप्तरी आमचे अशिलांची मालकी हक्क, कब्जे वहिवाटीची नोंद झालेली आहे. खरेदीखतापासून सदरची मिळकत आमचे अशिल मालकी हक्काने वहिवाटीत आलेले आहेत. आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर मालक वहिवाटदार आहेत.

वरीलप्रमाणे परिस्थिती असताना वरील नमूद गट नं.१०६/७/ड (४०/७/ड) पैकी ०० हे. ४५ आर क्षेत्र अस्तित्वात नसताना सदर मिळकतीचे सातबारा पत्रकी क्षेत्राची नोंद असलेला गैरफायदा घेऊन सदर श्री.येताळा भगवान तकीक सदरची मिळकत विक्री करणेचे विचारात व प्रयत्नात आहेत. सदरची मिळकत कोणी खरेदी केलेस सदर मिळकतीमधील खरेदी घेणार यांना कब्जा मिळणार नाही. खरेदी घेणार यांनी सदरची मिळकत अस्तित्वात आहे किंवा नाही याची कायदेशीररित्या खात्री केलेशिवाय सदरची मिळकत खरेदी करू नये. यदाकदाचित कायदेशीर बाबींची पूर्तता न करता सदरची मिळकत कोणी खरेदी घेतलेस खरेदी घेणार यांना सदरचे क्षेत्र शिल्लक नसलेने कब्जा मिळणार नाही. खरेदी घेणार यांची फसगत होऊन क्षेत्राबाबत गुंतागूंत होऊ नये म्हणून मी सावधानतेची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता.१३/१/२०२३

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड.कमलाकर विश्वनाथ वीर** (बी.ए.एलएल.बी)
**शिवाजीनगर, करमाळा., जि.सोलापूर**




प्रवेश !! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश !!

**अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट**

इंग्रजी : (३०-४०) | मराठी : (३०-४०) | हिंदी : (३०-४०)

टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे

किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

## वांगी नं.१ -पांगरे रस्त्यास निधी मंजूर-रस्ता संघर्ष समिती तर्फे आनंदोत्सव



करमाळा(सं.प्र.) : वांगी नं.१, २, ३, ४, भिवरवाडी, ढोकरी, नरसोबावाडी, पांगरे या गावातील नागरीकांसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या वांगी नं.१ ते पांगरे रस्त्याला पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून प्रशासकीय व तांत्रिक अशा दोन्हीही मंजुरी मिळाली आहे. हा रस्ता मंजूर व्हावा यासाठी अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या वांगी परिसरातील लोकांना न्याय मिळवून देणाऱ्या रस्ता संघर्ष समितीने पेढे भरवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी रस्ता संघर्ष समितीचे सदस्य व आदिनाथचे माजी व्हा.चेअरमन शहाजीराव देशमुख, बाजार समितीचे सभापती प्रा.शिवाजीराव बंडगर, आदिनाथचे संचालक पांडूरंग जाधव, माजी संचालक भारत साळुंके, महेंद्र पाटील, वांगीचे माजी सरपंच विठ्ठल शेळके, अर्जुन तकीक, ग्रा.पं.सदस्य दत्ता देशमुख, तानाजी देशमुख, सचिन पिसाळ, रामेश्वर तळेकर, धनंजय गायकवाड, ॲड.दिपक देशमुख, सेंद्रिय शेतीचे पुरस्कर्ते हनु यादव, ढोकरीचे सरपंच देवा पाटील, पांडूरंग खरात, सुभाष वळसे, बाबासाहेब चौगुले, गणेश पाटील, रोहित आहेरकर, विकास पाटील, नितीन देशमुख, अमर आरकिले, धनंजय गायकवाड, भिवरवाडीचे डॉ.भाऊसाहेब शेळके, आप्पा आरकिले, उत्तम धनवे, संजय रोकडे, कल्याण शिनगारे आदीजण उपस्थित होते. वांगी नं.१ ते पांगरे रस्त्यासाठी ४ कोटी ६६ लाख ५० हजार रूपये निधी मंजूर केल्याबद्दल आनंद व्यक्त करीत उपस्थितांनी एकमेकांना पेढे भरवले.

## गजानन सोशल ॲन्ड स्पोर्टस् क्लबच्या वतीने
## २५ जानेवारीला गणेश जयंती उत्सवानिमित्त महाप्रसाद





करमाळा(सं.प्र.) : वेताळपेठ येथील गजानन सोशल ॲन्ड स्पोर्टस् क्लबच्या वतीने २५ जानेवारी रोजी गणेश जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणार आहे. कोरोना काळानंतर पहिल्यांदाच गणेश जयंतीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणार असून, यावर्षी सहा हजार नागरीकांना महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे; अशी माहिती गजानन स्पोर्टस् क्लबचे संस्थापक व माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे यांनी दिली. याबाबत श्री.ढाळे म्हणाले, की गजानन सोशल ॲन्ड स्पोर्टस् क्लबच्या वतीने दरवर्षी गणेश जयंती उत्साहात साजरी करण्यात येते. कोरोनामुळे मोठ्याप्रमाणात गणेश जयंती साजरी करण्यात आली नाही. त्यामुळे यावर्षी मोठ्या स्वरूपात जयंती उत्सव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची भव्य तयारी करण्यात आली असून, २५ जानेवारीला सहस्त्रआवर्तन व गणेशयाग सोहळ्याचे आयोजन केले आहे. सायंकाळी सहा ते दहा यावेळेत महाप्रसाद होणार आहे. हा कार्यक्रम नागरपंचाचा वाडा, वेताळपेठ येथे होणार आहे. तरी करमाळा शहरातील जास्तीत जास्त नागरीकांनी घ्यावा; असे आवाहन प्रशांत ढाळे यांनी केले आहे.






## जय महाराष्ट्र पतसंस्थेच्या वतीने हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम संपन्न




करमाळा(सं.प्र.) : जय महाराष्ट्र नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने मकरसंक्रांती निमित्त हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम पतसंस्थेच्या कार्यालयात घेण्यात आला. यावेळी पतसंस्थेच्या संचालिका सुनिता बनसुडे, आशादेवी पाटणे, व्यवस्थापिका करूणा पवार, कॅशिअर रेखा राठोड, क्लार्क नम्रता मेहता, पिग्मी एजंट प्रभावती दिक्षित, लक्ष्मी हुंदाडे, सुरेखा राक्षे यांनी संस्थेच्या वतीने उपस्थित महिलांना मकरसंक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू कार्यक्रम करून शुभेच्छा दिल्या. तसेच पतसंस्थेच्या कामकाजाची माहितीही उपस्थित महिलांना देण्यात आली. या कार्यक्रमासाठी करमाळा शहरातील दोनशे महिला उपस्थित होत्या. उपस्थितांचे स्वागत महिला संचालिका सुनिता बनसुडे व आशादेवी पाटणे यांनी केले.

## बहुजन विकास बचत गटाची स्थापना

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील उद्योगधंद्यातील मुस्लिम युवक बांधवांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी बहुजन विकास बचत गटाची स्थापना करण्यात आली आहे. या बचत गटाचे उद्घाटन बहुजन विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष इसाक पठाण यांचे हस्ते झाले. यावेळी उपस्थितांना पठाण यांनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन कय्युम शेख यांनी केले तर आभार गटाचे सदस्य अशरफ तांबोळी यांनी मानले. बहुजन विकास बचत गटाचे अध्यक्ष म्हणून जमीर शेख, सचिव इन्नुस पठाण, खजिनदार अजिम मोगल यांची निवड करण्यात आली. या सर्व नूतन सदस्यांचा सत्कार ॲड.नईम काझी यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी फुरकान काझी, जाफर घोडके, बागवान, मकसूद बागवान, यासीन शेख, शौकत शेख, इब्राहिम शेख, इलाही आत्तार, शरीफ दारूवाले, ॲड.अलिम पठाण, बिलाल शेख आदी उपस्थित होते.

## भावपूर्ण श्रध्दांजली



कै.ज्ञानदेव देवराव दळवी(माऊली)

कष्टाने केली आयुष्याची सुरूवात
सगळयांवर फिरविला मायेचा हात
सुख जवळ येताच काळाने फिरवली पाठ
जन्मोजन्मी पाहू आम्ही तुमची वाट..!

बिटरगाव (श्री) येथील गणेश दूध संस्थेचे माजी चेअरमन **कै.ज्ञानदेव देवराव दळवी** यांचे दि.१४ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !

**दशक्रिया विधी :** सोमवार दि.२३/१/२०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता आदिनाथ मंदिराजवळ सीना नदी काठी, संगोबा येथे होणार आहे.

**शोकाकुल**

दत्तात्रय ज्ञानदेव दळवी (माजी मुख्याध्यापक, ना.ज.म.वि. झरे)
विलास ज्ञानदेव दळवी, सौ.विद्या महादेव शेरे (मुलगी) व समस्त दळवी परिवार

# घरासमोर लावलेल्या ट्रॅक्टरची चोरी

करमाळा(सं.प्र.) : घरासमोर लावलेल्या ट्रॅक्टरची चोरी झाली आहे. हा प्रकार १२ जानेवारीला मध्यरात्री गौंडरे येथे घडला आहे.

या प्रकरणी राजेंद्र सुखदेव काश्वीद (रा.गौंडरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आमच्या शेतीच्या कामासाठी स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र.एमएच ४५ एक्यु ३६५२ हा खरेदी केला होता. १२ जानेवारीला रात्री नऊ वाजता घरासमोर लावला होता. १३ जानेवारीला पहाटे उठून ट्रॅक्टर पाहिला असता, अज्ञात चोरट्यांनी तो चोरून नेला आहे. ट्रॅक्टरची किंमत साडेतीन लाख रूपये आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# हिरो स्प्लेंडर मोटारसायकलची चोरी

करमाळा (सं.प्र.) : घरासमोर लावलेल्या हिरो स्प्लेंडर मोटारसायकलची चोरी झाली आहे. हा प्रकार ११ जानेवारीला मध्यरात्री पोमलवाडी येथे घडला आहे.

या प्रकरणी अभिजीत प्रमोद सस्ते (रा.पोमलवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की सन २०२२ मध्ये नव्याने घेतलेली मोटार सायकल क्रमांक एमएच ४५ एआर ०५४४ ही नेहमीप्रमाणे ११ जानेवारीला सायंकाळी आमच्या घरासमोर लावली होती. पहाटे दीडच्या सुमारास लघुशंखेसाठी उठून घरातून बाहेर आलो असता, ५० हजार रूपये किंमतीची मोटारसायकल दिसून आली नाही. सदरची मोटारसायकल ही चोरट्याने चोरून नेली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस कॉन्स्टेबल हराळे हे करत आहेत.

# पैशाच्या कारणावरून वाशिंबे येथे एकास मारहाण

करमाळा(सं.प्र.) : मोबाईलच्या हप्त्याचे पैसे मागितले असता, राग येऊन एकास काठीने बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार १६ जानेवारीला सायंकाळी साडेसात वाजता वाशिंबे येथे घडला आहे. या प्रकरणी गफूर यासीन शेख यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की वाशिंबे येथील हनुमंत श्रीमंत पवार याला हप्त्याने मोबाईल घेऊन दिला होता. त्याचे पैसे कधी देतो; असे मागितले असता त्याला राग आला व त्याने काठीने डाव्या हातावर व पाठीवर मारहाण करून व शिवीगाळ दमदाटी करून निघून गेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# गावकामगार तलाठ्यास खंडणी मागणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : गावकामगार तलाठ्याकडून खंडणी वसुल करणाऱ्याविरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार करमाळा येथे १० जानेवारीला सकाळी अकरा वाजता घडला आहे. या प्रकरणी गावकामगार तलाठी अभिषेक चंद्रकांत काळे यांनी फिर्याद दिली आहे.

त्यात त्यांनी म्हटले आहे, की १० जानेवारीला सकाळी अकरा वाजता बाळासाहेब अनभुले या तलाठ्याने तलाठी कार्यालय, करमाळा येथे भेटण्यासाठी बोलविले. मला सांगितले, की किशोर बापू शिंदे (रा.खांबेवाडी) याच्याकडे तुमचे पैसे घेतानाचे व्हिडीओ आहेत. तो मुलगा मौलालीमाळावर थांबून आहे तर त्याची भेट घ्या.. असे सांगितले. नंतर मी तेथे गेलो असता, त्याने मोबाईलमधून व्हीडीओ क्लिप डिलीट करायची असल्यास सहा लाख रूपये रोख द्यावे लागतील.. असे सांगितले. त्याने सदरची क्लिपही दाखवली नाही. नंतर दोन लाख रूपये द्यावे लागतील.. असे सांगितले. त्यानंतर १३ जानेवारीला पुन्हा दीड लाख रूपये रक्कम देण्यास सांगितले व पोलीसांना अगर कोणास खबर दिल्यास तुला सोडणार नाही.. असा दम दिला. त्यानंतर १२ जानेवारीला दुपारी दोन वाजता किशोर शिंदे याने माझ्या मोबाईल फोनवर व्हॉटस्अप केला व मला दुपारी दोनच्या दरम्यान दीड लाख रूपये घेऊन बाबूकाका यांच्या पेट्रोलपंपावर बोलविले. त्यानूसार १३ जानेवारी ला सकाळी माझ्या खिशामध्ये असलेले ९ हजार ५०० रूपये घेऊन पोलीस ठाणे येथे आलो. त्यानूसार पोलीसांनी त्याबाबत सापळा रचण्याचे ठरविले. त्यानूसार हिरव्या रंगाच्या कागदाचे एकूण तीन बंडल व पांढऱ्या रंगाचे कागदाचा एक बंडल तयार केला. त्यानूसार पोलीस व पंच व मी असे पेट्रोलपंपावर १३ जानेवारीला साडेअकरा च्या सुमारास गेलो. त्यावेळी पोलीसांनी वेषांतर केलेले होते. दरम्यान किशोर शिंदे हा मला म्हणाला की.. तु दीड लाख रूपये दे नाहीतर व्हीडीओ क्लिप व्हायरल करेल ! त्यानंतर मी ९ हजार ५०० रूपये रोख असलेली रक्कम चार बंडलात किशोर शिंदे यांना दिली व ती खंडणी स्वीकारताना तो पोलीसांना रंगेहाथ सापडला आहे. या प्रकरणी पोलीसांनी खंडणी व धमकीचा गुन्हा किशोर शिंदे याच्याविरूध्द दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# दरवाजाची कडी उचकटून ६५ हजाराची चोरी

करमाळा(सं.प्र.) : घराच्या दरवाजाची कडी उचकटून चोरट्याने घरात प्रवेश करून ६५ हजार रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. हा प्रकार १४ जानेवारीच्या मध्यरात्री भाळवणी येथे घडला आहे.

या प्रकरणी नितीन येताळ बनसोडे (रा.भाळवणी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १४ जानेवारीला आम्ही सर्व जेवून झोपलो होतो. शेजारच्या खोलीचा दरवाजा बंद करून बाहेरून कडी लावून झोपलो होतो. त्या मध्यरात्री दाराची कडी उचकटून चोरट्याने घरातील लोखंडी पेटी उचकटून त्यातून २५ हजार रूपये रोख, १५ हजार रूपये किंमतीच्या सोन्याची ठुसी व १५ हजार रूपयाचा सोन्याच्या गंठनचा पट्टा चोरट्याने चोरून नेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने पुढील तपास करत आहेत.

# ट्रॅक्टरची रस्त्यावरील दुभाजकास धडक - ट्रॅक्टर चालक जागीच ठार

करमाळा(सं.प्र.) : भरधाव वेगात ट्रॅक्टर चालवून रस्त्यावरील दुभाजकास धडकून झालेल्या अपघातात ट्रॅक्टर चालक जागीच ठार झाला आहे. हा अपघात आदिनाथ कारखान्यासमोर १२ जानेवारीला सायंकाळी साडेसात वाजता घडला आहे. या प्रकरणी भाळवणी येथील पोलीस पाटील विशाल बिभिषण धेंडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की कंदरहून करमाळ्याकडे जाणारा लाल रंगाचा ट्रॅक्टर सुरेश केशव चव्हाण(वय-५५, रा.कंदर) हा भरधाव वेगात विरूध्द बाजूने ट्रॅक्टर चालवून आदिनाथ कारखान्या समोरील दुभाजकाला जोराची धडक देऊन झालेल्या अपघातात ट्रॅक्टर व ट्रॉली एका बाजूला पडल्या तर सुरेश चव्हाण डांबरी रस्त्यावर डोक्यावर पडला. डोक्याची कवटी फुटून त्याचे मास बाहेर पडले होते. तो जागीच ठार झाला आहे. या प्रकरणी पोलीसांनी मयतच्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहूरकर हे करत आहेत.

# ट्रकसह २५ हजार रूपये किंमतीची चोरीची वाळू जप्त

करमाळा(सं.प्र.) : कर्जतकडून करमाळ्याकडे जाणाऱ्या ट्रक मधून चोरीची वाळू जात असताना पोलीसांनी पकडली आहे. हा प्रकार ७ जानेवारीला पहाटे साडेपाच वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अमोल जगताप यांनी फिर्याद दिली.

त्यात त्यांनी म्हटले आहे, की कर्जतकडून एक सहाचाकी ट्रक मधून चोरीची वाळू येत असल्याची माहिती समजली होती. त्यानूसार आम्ही पोलीस कर्मचारी व पंच लिंबेवाडी फाट्याजवळ थांबलो असता, सहाचाकी ट्रक क्र.एनएच १४ बीजे २९०७ हा भरधाव वेगात जाताना आढळला. त्यास आडवून तपासणी केली असता त्यात २५ हजार रू. किंमतीची अडीच ब्रास वाळू सापडली आहे. या प्रकरणी ट्रकचालकाविरूध्द गुन्हा दाखल केला असून पाच लाख किंमतीचा ट्रक व २५ हजार रूपयाची वाळू जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# रस्त्यावर अडथळा करणाऱ्या रिक्षा चालकाविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरातील बसस्थानकासमोर रस्त्यावरील रहदारीस अडथळा होईल; अशा पध्दतीने रिक्षा लावणाऱ्या रिक्षा चालकाविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार १४ जानेवारीला दुपारी साडेबारा वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दिपक नागनाथ कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आम्ही गस्त घालत असताना करमाळा बसस्थानकासमोर अर्जुन गोविंद चव्हाण (रा.श्रीदेवीचामाळ) यांनी त्याच्या ताब्यातील रिक्षा रस्त्यावर जाणाऱ्या लोकांच्या रहदारीस अडथळा होईल; अशा स्थितीत लावलेली आढळून आली. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास प्रविण साने हे करत आहेत.

याचप्रमाणे रतिलाल तुकाराम चव्हाण (रा.श्रीदेवीचामाळ) याने सुध्दा आपली रिक्षा एस.टी.स्टॅन्ड समोर १४ जानेवारीला दुपारी बारा वाजता रहदारीस अडथळा होईल; अशा स्वरूपात लावली होती. त्यामुळे त्याच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ऊस तोडीच्या कोपीतून २२ वर्षाची विवाहिता बेपत्ता

करमाळा (सं.प्र.): २२ वर्षाची विवाहिता ऊस तोडीच्या कोपीतून बेपत्ता झाली आहे. या प्रकरणी बेपत्ता महिलेच्या पतीने पोलीसात १४ जानेवारीला हरवल्याची नोंद केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २२ वर्षाच विवाहिता माझ्या सोबत कोपीत रहात असताना स्वत:हून निघून गेली. तीचा तपास लागलेला नाही. या प्रकरणी पोलीसांनी हरवल्याची तक्रार नोंदली आहे.

# अंधारात दबा धरून बसलेल्या तरूणास पोलीसांकडून अटक

करमाळा (सं.प्र.): अंधारात आपले अस्तित्व लपवून बसलेल्या तरूणास पोलीसांनी अटक केली आहे. हा प्रकार १५ जानेवारीला रात्री साडेअकराच्या सुमारास जेऊर येथील शेटफळ चौकात घडला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल तौफिक रज्जाक काझी यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १५ जानेवारीला आम्ही गस्त घालत असताना जेऊर येथील शेटफळ चौकालगत शिवपार्वती अ‍ॅग्रो खताच्या दुकानच्या पाठीमागे अंधारात एक माणूस लपून बसला होता. आम्ही त्याच्याकडे जात असताना तो पळून जावू लागला. त्यानंतर त्यास पकडले असता, तो योगेश राजा काळे (रा.केडगाव) असे असल्याचे समजले. त्याच्यावर मुंबई पोलीस कायदा १२२ ब प्रमाणे पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साने हे करत आहेत.

# पाहता.. पाहता.. एक वर्ष सरलं !



करमाळा शहरातील वीर चौकातील नाव घेण्याजोगी काही श्रेष्ठ व्यक्ती होऊन गेल्या आहेत. यात भाई साहेबराव वीर(आप्पा), त्यानंतर बॉन्डरायटर व जगदंबा देवस्थानचे ट्रस्टी विश्वनाथ तात्या वीर, दशरथ वनारसे आप्पा, दत्तात्रय भाऊ वनारसे, कृष्णा आप्पा वैकर ही जुन्या पिढीची माणसं एकापाठोपाठ एक गेली. पण या सर्वांचा दुवा असणारे आणि सर्वांनाच दुवा देणारे केशवबापू वीर हे मात्र वटवृक्षासारखे वीर चौकातील सर्वजणावर छाया ठेवून कार्यरत होते. थोडाफार आजार असलातरी त्यावर मात करून जवळपास शेवटच्या एक महिनापर्यंत ते कचेरीत जात होते हे त्यांचे विशेष !

माणसाचं जगणं हे आपल्याच माणसावर वाढतं असं म्हणतात. पण आपलीच माणसं जेव्हा अचानक सोडून जातात तेव्हा ज्येष्ठांना त्याचा निश्चितच ताण पडतो. बापूंच्या बाबतीत असंच झालं.. पुतण्या नानासाहेब वीर आणि बंधू नागनाथ वीर यांची आकस्मात झालेली निधनं ही बापूंना वेदनादायी ठरली आणि या दु:खातच बापू सर्वांचाच निरोप घेऊन २३ जानेवारी २०२२ ला गेले. खरंतर बापू गेले असे म्हणावेसे वाटत नाही. बापूंची शिस्त, बापूंचे संभाषण, बापूंचे हस्ताक्षर आणि बापूंचा जोडलेला स्नेहमेळा आजही सर्वांना जसाच्या तसा जाणवतो. खरंतर बापूवर लिहावं तेवढं खूप थोडं आहे. बापूंनी स्वत:च अनेकांवरती अनेक लेख लिहिलेले आहेत व ते आम्ही छापलेले आहेत. त्यांचे वक्तृत्वही उत्तम होते. संत तुकोबारायांनी म्हटले आहे.. 'कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक । तयाचा हरीक वाटे देवा ॥' याप्रमाणे बापूंची पुढची पिढी ही सुसंस्कृत आहे. बापूंचा यथार्थ वारसा चालवणारे आहेत. तरीही बापूंची आठवण कायम येते.

बापूंच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांच्या मुलांनी अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांना एक लाख रूपयाची देणगी देऊन एक बापूंच्या स्वभावाची एक चुणूक दाखवून दिली आहे. येथील श्रीराम प्रतिष्ठान संचलित अन्नछत्र मंडळाचे एका दिवसाच्या जेवणाची जबाबदारी स्विकारली व पुण्यस्मरणाचा कार्यक्रमही ह.भ.प.अभयकुमार शहाणे यांच्या किर्तन सेवेतून परिपूर्ण केला आहे. एकंदरीत बापू जाऊन एक वर्ष सरले हेच कळले नाही !

प्रदीप(दादा) वीर, प्रविण(भाऊ) वीर ही दोघंही मुलं अतिशय शिस्तप्रिय आणि संयमी आहेत. आपल्या व्यवसायाचा सन्मान राखत बापूंनी जोडलेल्या माणसांना बरोबर घेऊन जात आहेत. सौ.प्रतिभा रमेश सुरवसे (सोलापूर), सौ.प्रचिती विनायक टकले (बारामती) या दोघी कन्या आपापल्या घरी सुखात आहेत. सौ.पुजा प्रदीप वीर या थोरल्या सुनबाई तर अॅड.सौ.सुजाता प्रविण वीर (विधी अधिकारी) या धाकट्या सुनबाई यांनी बापू असतानाही आणि त्यानंतरही आपल्या घराची परंपरा आणि संस्कृती जतन करण्याचं काम करत आहेत. कौस्तुभ, विपुल हे नातू आणि कनिष्का ही नात बापूंकडून कसं बोलावं आणि कसं चुणचुणीत रहावं हे शिकलेले आहेत. एकंदरीत बापूनं समाजकाम, व्यवसाय करताना आणि माणसं जोडताना आपल्या घराला एक शिस्त, एक वेगळ वळण लावले होते. ती परंपरा बापूंच्या पत्नी श्रीमती हिराबाई जतन करत आहेत

# अखेर 'मावशी' गेल्या !

**माझी डायरी**

गेल्या आठवड्यात नगरपालिकेतील संजय जगताप यांचा फोन आला व आई गेल्या.. असे सांगितले. त्यांच्या आई म्हणजे निलावती कांतीलाल जगताप. त्यांना मी मावशीच म्हणत असत. गेल्या २० वर्षापासून या मावशीचा आणि माझा कोर्ट कामाच्या निमित्ताने कायम संपर्क होता. सुरूवातीला त्यांच्या बऱ्याच अडचणी होत्या आणि त्यांना कोर्टात येता येईल असे वातावरण नव्हते. किंबहूना त्यांचे काम माझ्या काही सहकाऱ्यांनी नाकारले होते. माझ्याकडे त्या भीतभीतच आल्या होत्या. त्यांचे काम मी स्वीकारले आणि त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत चालविले. सुरूवातीला दोन-पाच वर्षात काही वकील म्हणून त्यांनी फि दिली, पण त्यानंतर गेल्या कित्येक वर्षात त्यांच्या कडून फी घेणे हा विषय ठेवलाच नव्हता. सुरूवातीला त्या प्रकृतीने चांगल्या होत्या. कोर्टात सतत येत होत्या, हजर राहत होत्या; पण गेल्या दहा वर्षापासून त्या थकल्या होत्या. खरंतर त्यांची परिस्थिती खूपच नाजूक. एकुलता एक मुलगा नगरपालिकेत रोजंदारीवर कामाला. सुनबाई थोड्याफार काम करतात. पदरी रमा नावाची विकलांग मुलगी आणि त्याही शरीरयष्टीने नाजूक असलेल्याच होत्या. कुटूंबात उत्पन्नाचे साधन नाही. पोटगीवरतीच कसेबसे त्यांचे जीवन चालले होते. कधी काळी पोटगी मिळाली नाहीतर त्या खूप नाराज होत असत. तेव्हा हजार-पाचशे रूपये उसणे घेऊन जात होत्या आणि पोटगीचे आले की स्वत:हून काढून देत होत्या. सुरूवातीला समोरच्यांकडून पोटगी देण्यास टाळाटाळ होत होती, पण एकदा त्यांना सर्व गोष्टी समजावल्या. मग त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे दर महिन्याला पोटगी देत गेले. पोटगीचा पैसा त्यांना मिळाला नसता तर त्या व त्यांची मुलगी स्वाभिमानाने जगल्या नसत्या. मावशीला विकलांग मुलीचे खूप दु:ख होते. तरूण मुलीने आपल्या आईची काळजी घेणं गरजेचं होतं. पण इथं वृध्द आईलाच या तरूण मुलीची काळजी घ्यावी लागत होती. एक दिवस मावशी कोर्टात आल्या आणि रडू लागल्या. म्हणलं.. मावशी का रडता ? त्या म्हणाल्या.. "रमा सुटली.., गेली..., आता माझी वेळ आहे. माझ्या समक्ष रमा गेली, याबद्दल मी देवाचे आभार मानते !" मुलाला त्या 'बापू' म्हणत होत्या. "बापू एकटा काय करेल ? सुनबाई बिचारी खूप चांगली आहे, पण तिची लेकरं, सर्वांचा स्वयंपाक आणि तिची नोकरी.. कसा कसा मेळ घालते ते अवघड आहे. मला या शरीरयष्टीने काहीच करता येत नाही हो ! बापूच्या प्रपंचाला मदत करावी ही खूप इच्छा आहे. पण देवानं मला तेवढं सामर्थ्य दिलं नाही."



सामान्य परिवारात किती अडचणी असतात आणि अशा अडचणीवरतीही हा परिवार मात करत व कोणाविरूध्द तक्रार न करत जीवन जगत असतो; याची प्रचिती या मावशीच्या परिवारातून जाणवली. खरंतर सलग २० वर्ष किमान महिन्यातून एकदा या मावशीचा संपर्क व्हायचा, पण हा संपर्क म्हणजे मला माझ्या मातोश्रीचा स्पर्श वाटत होता. अशी असणारी मावशी अचानक सोडून गेली. जन्माला येणार तो जाणारच.. त्याबद्दल काहीच बोलता येत नाही. पण परमेश्वराकडं एकच मागणं निदान तुझ्या दरबारात तरी मावशीला सुख दे...!

# गायनसम्राट बंडोपंत कुलकर्णी काळाच्या पडद्याआड



करमाळा(सं.प्र.) : किल्ला विभाग येथील रहिवाशी व श्री विठ्ठल-रूक्मीणी मंदिराचे मालक तसेच गायनसम्राट पांडूरंग वासुदेव तथा बंडोपत कुलकर्णी (वय-८६) यांचे १६ जानेवारीला सकाळी पावणेनऊ वाजता राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन विवाहित मुली, जावई असा परिवार आहे.

बंडोपंत काका या टोपण नावाने ते करमाळा शहर व परिसरात परिचीत होते. डोक्यावर पांढरी टोपी, अंगात तीन गुंड्याचा पांढरा शर्ट व धोतर, कपाळावर विठ्ठलाचा टिळा असा त्यांचा कायमचा पेहराव होता. बंडोपंत काका हे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांनी हयातीपर्यंत विठ्ठल-रूक्मीणीची सेवा केली. सकाळी लवकर उठून ते नियमितपणे विठ्ठल-रूक्मीणीची पुजा करून पुढील कामासाठी कार्यरत रहात होते. त्यांना पेटी वाजविणे व गायनामध्ये मोठी रूची होती. लग्न समारंभात त्यांची हजेरी असली की, त्यांच्या मुखातून मंगलाष्टीकेचा स्वर निघाल्याशिवाय रहात नव्हता. काकांच्या सुरेल आवाजामुळे ते गायनसम्राट म्हणून ओळखले जात होते. एकादशीला विठ्ठल मंदिरात भजन गीतगायनाचा कार्यक्रम तसेच दरवर्षी महिन्याभर मंदिरात पहाटे पासून चालत असलेला काकडा, गोकुळ आष्टमीनिमित्त हरिनाम सप्ताह, आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या दिंड्यांची भोजनाची तसेच मंदिरात वारकऱ्यांची मुक्कामाची व्यवस्था करणे, गरीब गरजूंना मदतीचा हात पुढे करणे अशा विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमात ते नेहमी अग्रेसर असत. करमाळा भूषण कै.गिरधरदास देवी यांचे ते कट्टर समर्थक होते. गेली दोन वर्षे ते आजाराने त्रस्त होते. १६ जानेवारीला सकाळी पावणेनऊ वाजता त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल ब्रह्मवृंद संस्था, श्री दत्तात्रय देवालाय समिती व किल्ला विभाग परिसरातील नागरीकांनी दु:ख व्यक्त केले.

प्रोप्रा : सुर्यकांत कदम करमाळा तालुक्यात प्रथमच
मो.9623138222
9623849468
माऊली
रोलींग शटर्स & मटेरियल सप्लायर्स


होलसेल दरात शटरचे सर्व मटेरियल व शटरची कामे तसेच फॅब्रीकेशनची कामे करून मिळतील.
M.S.डिझाईनचे होलसेल विक्रेते
तयार शटर 100 रू. किलोप्रमाणे मिळेल.

श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत, मौलालीमाळ, जेऊर रोड, करमाळा.


मार्गदर्शक
डॉ.प्रदीपकुमार जाधव-पाटील
श्री आदिनाथ सह.साखर कारखान्याचे मा.चेअरमन
मा.श्री.संतोष पाटील
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ! तसेच तरटगाव ग्रामपंचायतीच्या
सरपंच पदी सौ.रजनी महावीर जगदाळे यांची तर
उपसरपंच पदी श्री.अभिजीत प्रदीपकुमार पाटील
यांची निवड झाल्याबद्दल व सर्व सदस्यांचे
हार्दिक अभिनंदन !
मा.चेअरमन, आदिनाथ स.सा.कारखाना
नूतन उपसरपंच
सरपंच
रजनी महावीर जगदाळे
ग्रा.पं.सदस्य
श्रीनाथ दिलीप घाडगे
ग्रा.पं.सदस्या
अनुजा वसंत जाधव
ग्रा.पं.सदस्या
ज्योती हरिदास मोरे
शुभेच्छुक तरटगाव ग्रामपंचायत व सर्व ग्रामस्थ
ग्रामसेवक : रामकिसन बडे


Place to chill and dine
SPOTLIGHT HOTEL
FAMILY RESTAURANT
VEG
NON-VEG
SPOTLIGHT
मच्छी थाळी फक्त 99/-
11 AM 5 PM
स्पेशल डिश...
पनीर तुफानी
पनीर मटका कबाब
पनीर रोमांचक
चिकन रान
• फ्री वाय-फाय • खास फॅमिलीसाठी • प्रशस्त पार्किंग • फोटो शूटसाठी निसर्गरम्य पॉईंट
करमाळ्यात
फ्री होम डिलीव्हरी
(सकाळी ११ ते रात्री ११ पर्यंत)
आमच्याकडे बर्थडे, ॲनिवर्सरी पार्टीचे बुकींग घेतले जाईल.
करमाळा-कर्जत रोड (नागोबा मंदिर पासून २००मीटर)
मो.9699175956, 9579516545, 9145213173


दहावे
पुण्यस्मरण
कै.आजिनाथ(तात्या) गुंडीबा घाडगे
(मृत्यू दि.२५/१/२०१३, पुण्यस्मरण दि.२५/१/२०२३)
तुमच्या स्मृतीने घेऊ स्फुर्ती,
तुमच्या सत्कार्याची करू पूर्ती
आमच्या हृदयी तुमची मुर्ती,
परमेश्वर देवो तुम्हांस चिरशांती
कै.आजिनाथ(तात्या) गुंडीबा घाडगे यांच्या १० व्या पुण्यस्मरणानिमित्त
त्यांच्या पवित्र स्मृतीस.... भावपूर्ण आदरांजली !
आपले
• न्यु.त्रिमुर्ती स्टील फर्निचर, मंगळवारपेठ, करमाळा. (८४८४९४८४५४)
• त्रिमुर्ती उद्योग समुह, परांडा • समस्त घाडगे परिवार, करमाळा.